**सहशिक्षक व प्राथमिक पदवीधर वेतनश्रेणी संवर्गाची एकत्रित दिनांक 01/01/2015 ची अंतिम ज्येष्ठता सुची प्रसिद्ध करणे बाबत.**

**शिक्षण विभाग (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, लातूर**
जाक्र./जिपला/शिविप्रा/कार्या-21/कावि-349 /2017
दिनांक - 16 / 12 /2017.

परिपत्रक

शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, लातूर अंतर्गत सहशिक्षक व प्राथमिक पदवीधर वेतनश्रेणी संवर्गाची एकत्रित दिनाक 1/1/2015 ची तात्पुरती ज्येष्ठता सुची या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जिपला/शिक्षण (प्राथ)/जेसु/कार्या09/सीआर23/2014, दि.05/02/2016 अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली होती, व त्यानुसार गट स्तरावरुन आक्षेप मागविण्यात आलेले होते.त्यावर प्राप्त हरकती व प्रतिवेदने विचारात घेवुन प्राथमिक शिक्षक संवर्गाची दि.1/1/2015 पर्यंतची अंतिम ज्येष्ठता सुची प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तेंव्हा कार्यालय प्रमुखांनी सदरहु अंतिम ज्येष्ठता सुचीची प्रत आपल्या अधिपत्याखाली संबंधित कर्मचा-यांस देण्यात यावी, व तसे केल्याचे या कार्यालयास अवगत करावे. ज्येष्ठता सुची प्रसिद्ध न झाल्याची तक्रार येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

16/12/17

शिक्षणाधिकारी(प्राथ)
जिल्हा परिषद, लातूर

प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव

1. सर्व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, ---------------------------, जि.लातूर यांना देवुन सुचित करण्यात येते की, सदरील अंतिम ज्येष्ठता सुची आपल्या गटांतर्गत येणा-या सर्व जि.प.के.प्रा.शा./ प्रा.शा/ प्रशालेतील उक्त नमुद शिक्षक संवर्गातील कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन स्वाक्षरी घेण्यात यावी, व आपल्या स्तरावरुन अंतिम ज्येष्ठता याद्या नोटीस बोर्डावर डकविण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास उलटटपाली विनाविलंब सादर करावा.

sd/-
शिक्षणाधिकारी(प्राथ)
जिल्हा परिषद, लातूर